*राज्यपाल आचार्य देवव्रत आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी त्यांचं सकाळी विमानतळावर स्वागत केलं. पहिल्यांदाच भारत दौऱ्यावर आलेल्या स्टार्मर यांच्यासोबत ब्रिटनमधल्या सव्वाशे उद्योजकांचं आतापर्यंतच सर्वात मोठं शिष्टमंडळ आहे. व्यवसाय सुलभतेच्या धोरणातून गुंतवणूकदारांच्या समस्या लवकर सोडवण्याचं राज्य सरकारचं धोरण असल्याचं मुख्यमंत्र्यांनी ब्रिटीश शिष्टमंडळाला सांगितलं. उद्योजकांसाठी सरकारनं केलेल्या विविध उपाययोजनांची माहिती त्यांनी दिली.*

*प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासोबत स्टार्मर उद्या मुंबईतल्या राजभवनात द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. त्यानंतर दोन्ही नेते ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये सहभागी होतील आणि उद्योजकांशी चर्चा करतील.)*

**<><><><>**

म्यानमारमधे सरकारविरोधी आंदोलनात सहभागी असलेल्या आंदोलकांवर लष्कराने पॅराग्लायडरने टाकलेल्या बॉम्बमुळे झालेल्या स्फोटात २४ जणांचा मृत्यू झाला तर ४७ जण जखमी झाले आहेत. तसंच ६ ऑक्टोबर रोजी सागाईंग प्रांतात बौद्ध उत्सवासाठी जमलेल्या शंभर जणांच्या जमावावर लष्कराने हल्ला केला.

**<><><><>**

रसायन शास्त्रातला यंदाचा नोबेल पुरस्कार जपानच्या क्योटो विद्यापीठाचे सुसुमु कितागावा, ऑस्ट्रेलियाच्या मेलबर्न विद्यापीठाचे रिचर्ड रॉबसन आणि अमेरिकेच्या कॅलिफोर्निया विद्यापीठाचे ओमर याघी यांना जाहीर झाला आहे.

रेणूंचा नवा आराखडा तयार केल्याबद्दल त्यांना या पुरस्कारानं गौरवण्यात आला. यामुळं वाळवंटातल्या हवेतून पाणी साठवणं, पाण्यातून प्रदूषित घटक काढणं यासारख्या गोष्टी सोप्या झाल्या आहेत.

**<><><><>**

आंध्र प्रदेशातल्या कोन्नासीमा जिल्ह्यात फटाक्यांच्या कारखान्यात लागलेल्या आगीत ६ कामगार भाजून मरण पावले तर काही जण जबर जखमी झाले. जखमींपैकी दोघांची प्रकृती चिंताजनक आहे.  लक्ष्मी गणपती कारखान्यात ही  घटना घडली. फटाक्याच्या दारूने झालेल्या या स्फोटात कारखान्याचं छपरं कोसळलं. मुख्यमंत्री एन

